# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
## (नगरपालिका शाखा)

दूरध्वनी क्र.0241-2345680 E-mail ID - daoahmednagar@gmail.com

क्र.नपा/कार्या-6अ/2050/2016 अहमदनगर,दि.05/07/2016

प्रति ,

जिल्हा विज्ञान सूचना अधिकारी
एन.आय.सी.अहमदनगर

**विषय :- प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती याची प्रसिध्दी व त्यावरील हरकती दाखल करणे.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस असे कळविण्यात येते की , अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर,संगमनेर,कोपरगांव,राहुरी,देवळाली प्रवरा,राहाता,पाथर्डी या सात नगरपरिषदा व शिर्डी नगरपंचायत यांची मुदत डिसेंबर 2016 मध्ये संपत आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने, डिसेंबर-2016 मध्ये मुदत संपणा-या नगरपरिषद/नगरपंचायतीच्या, दि.15/06/2016 रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार, अहमदनगर जिल्हयातील उपरोक्त नमूद सात नगरपरिषदा व एक नगरपंचायत यांची प्रारुप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे व दि.02/07/2016 रोजी निश्चित करण्यात आलेले सदस्य पदांचे आरक्षण, सर्व रहिवाश्यांना माहिती होणेसाठी, आज दि.05/07/2016(मंगळवार) पासून त्याची जाहीर माहिती जिल्हयातील सर्व नागरीकांना होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर अधिकृतरित्या प्रसिध्द करावयाचे आहे.त्याअनुषंगाने या सोबत जोडलेली "जाहीर सूचना". प्रसिध्द करण्यात यावी.

जिल्हाधिकारी अहमदनगर करीता

# जाहीर सूचना

" अहमदनगर जिल्हयातील डिसेंबर-2016 मध्ये मुदत संपणा-या नगरपरिषदांची/ नगरपंचायतीची प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती याची प्रसिध्दी व त्यावरील रहिवाश्यांच्या हरकती दाखल करणे "

अहमदनगर जिल्हयातील सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर,संगमनेर,कोपरगांव,राहुरी,देवळाली प्रवरा,राहाता,पाथर्डी या सात नगरपरिषदा व शिर्डी नगरपंचायत यांची मुदत डिसेंबर 2016 मध्ये संपत आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने, डिसेंबर-2016 मध्ये मुदत संपणा-या नगरपरिषद/नगरपंचायतीच्या, दि.15/06/2016 रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार, अहमदनगर जिल्हयातील उपरोक्त नमूद सात नगरपरिषदा व एक नगरपंचायत यांची प्रारुप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे व दि.02/07/2016 रोजी निश्चित करण्यात आलेले सदस्य पदांचे आरक्षण, सर्व रहिवाश्यांना माहिती होणेसाठी, आज दि.05/07/2016(मंगळवार) पासून संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालय, संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत संकेतस्थळ व जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकृतरित्या प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यावर हरकत अथवा सूचना असल्यास, संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचेकडे त्या संबंधीत नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालयात, कार्यालयीन वेळेत, दि.14/07/2016 ( गुरुवार) पर्यंत दाखल करण्यात याव्यात.

**(अनिल कवडे)**
जिल्हाधिकारी अहमदनगर